सोलापूर
तरुण भारत
# सदाफुली
https://dainiktarunbharat.com
https://epaper.dainiktarunbharat.com
बुधवार, १ एप्रिल २०२६


आतील पानावर

पान २– अनुष्काचं कमबॅक?
पान ३– आज 'ती' खूश झाली असती!
पान ४– दाक्षिणात्य सिनेमात सहा वर्षानंतर...
पान ५– 'राजा शिवाजी'त जिनिलीया साकारणार...
पान ७– इमरान हाश्मीचा आवारापण २ येतोय!

# कार्तिक आर्यन 'इच्छाधारी नागा'च्या भूमिकेत

बॉलिवूडचा 'चॉकलेट बॉय' कार्तिक आर्यन आता एका अत्यंत वेगळ्या आणि खास भूमिकेत प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. करण जोहरची निर्मिती असलेल्या 'नागझिला' या चित्रपटात कार्तिक चक्क एका 'इच्छाधारी नागा'ची भूमिका साकारणार आहे. या बहुप्रतिक्षित चित्रपटाच्या थिएटर आणि ओटीटी प्रदर्शनाबाबत नुकतीच माहिती समोर आली आहे. 'नागझिला' हा चित्रपट एका अशा काल्पनिक जगावर आधारित आहे, जिथे रूप बदलणारे 'इच्छाधारी नाग' मानवी वस्तीत गुपचूप राहतात. कार्तिक यात एका बेफिकीर इच्छाधारी नागाची भूमिका साकारत आहे. मात्र, जेव्हा एका धूर्त आणि सत्तालोभी खलनायकाची नजर त्याच्या मौल्यवान 'नागमणी'वर पडते, तेव्हा कार्तिकचे आयुष्य पूर्णपणे बदलून जाते. हा चित्रपट अ‍ॅक्शन, फँटसी आणि ड्रामाने परिपूर्ण असणार आहे. मृगदीप सिंग लांबा दिग्दर्शित 'नागझिला'चे चित्रीकरण सध्या वेगाने सुरू आहे. कार्तिकने सेटवरील काही झलक यापूर्वीच सोशल मीडियावर शेअर केल्या होत्या. हा चित्रपट १४ ऑगस्ट २०२६ रोजी स्वातंत्र्यदिनाच्या मुहूर्तावर चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होणार आहे. विशेष म्हणजे, चित्रपटगृहातील प्रदर्शनानंतर हा चित्रपट अ‍ॅमेझॉन प्राइम व्हिडीओ या ओटीटी प्लॅटफॉर्मवर प्रदर्शित केला जाईल, अशी घोषणा कार्यक्रमात करण्यात आली. 'नागझिला' व्यतिरिक्त कार्तिक आर्यनचे आणखी दोन मोठे चित्रपट रांगेत आहेत. अनुराग बसू दिग्दर्शित 'तू मेरी जिंदगी है' या रोमँटिक ड्रामामध्ये तो दाक्षिणात्य अभिनेत्री श्रीलीला सोबत दिसणार आहे. तसेच, हंसल मेहता यांच्या 'कॅप्टन इंडिया' या बायोपिकमध्येही तो मुख्य भूमिका साकारत आहे.







# अर्जुन रामपालची साऊथच्या सिनेमात एन्ट्री

'धुरंधर २'मध्ये मेजर इकबालची भूमिका साकारून अभिनेता अर्जुन रामपाल चर्चेत आला आहे. या सिनेमातील त्याच्या अभिनयाचं कौतुकही होत आहे. 'धुरंधर २'नंतर अर्जुन रामपालला लॉटरी लागली आहे. मेजर इकबालची भूमिका साकारणाऱ्या अर्जुन रामपालची साऊथच्या सिनेमात एन्ट्री झाली आहे. अर्जुन रामपाल ऋषभ शेट्टीच्या 'छत्रपती शिवाजी महाराज' या सिनेमात दिसणार आहे. 'छत्रपती शिवाजी महाराज' सिनेमात अभिनेता ऋषभ शेट्टी हा छत्रपती शिवाजी महाराजांच्या भूमिकेत आहेत. या सिनेमात शिवरायांची ऐतिहासिक पराक्रमाची गाथा मोठ्या पडद्यावर उलगडण्यात येणार आहे. या सिनेमात अर्जुन रामपाल खलनायकाच्या भूमिकेत दिसणार आहे. अर्जुन रामपाल 'छत्रपती शिवाजी महाराज' सिनेमात कोणती भूमिका साकारणार हे अद्याप समोर आलेलं नाही. पण, त्याला ऐतिहासिक भूमिकेत पाहण्यासाठी प्रेक्षकही आतुर आहेत. 'छत्रपती शिवाजी महाराज' सिनेमात ऋषभ शेट्टी मुख्य भूमिका आहे. अभिनेत्री शेफाली शाह राजमाता जिजाऊंच्या भूमिकेत दिसणार आहे. तर अर्जुन रामपाल व्हिलन साकारणार आहे. संदी सिंह या सिनेमाचं दिग्दर्शन करणार आहेत. २०२६ मध्ये या सिनेमाच्या शूटिंगला सुरुवात होणार आहे. बिग बजेट आणि भव्य दिव्य सिनेमाची चाहत्यांनाही उत्सुकता आहे. २०२७ मध्ये हा सिनेमा प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.

# अग्निहोत्रींनी केली 'ऑपरेशन सिंदूर'ची घोषणा

'द काश्मीर फाइल्स' फेम दिग्दर्शक विवेक अग्निहोत्री पुन्हा चर्चेत आले आहेत. यावेळी ते 'ऑपरेशन सिंदूर' वर चित्रपट बनवणार आहेत. विवेक अग्निहोत्री यांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून ही माहिती दिली आहे. भूषण कुमार यांची टी-सीरीज आणि विवेक रंजन अग्निहोत्री यांची आय एम बुद्धा प्रॉडक्शन यांनी अधिकृतपणे 'ऑपरेशन सिंदूर'ची घोषणा केली



आणि विवेक अग्निहोत्री पहिल्यांदाच या निमित्ताने एका मोठ्या सिनेमासाठी एकत्र काम करणार आहेत. निर्माते भूषण कुमार यांनी सांगितले की, विवेक अग्निहोत्री यांच्याकडे कथा सांगण्याची एक वेगळी आणि प्रभावी शैली आहे. 'ऑपरेशन सिंदूर' हा सिनेमासाठी एक महत्त्वाचा टप्पा ठरेल. 'ऑपरेशन सिंदूर' हा चित्रपट पहलगाम हल्ला आणि त्यानंतर भारताने ऑपरेशन सिंदूरच्या माध्यमातून पाकिस्तानवर केलेल्या थरारक मोहिमेवर आधारीत आहे. या चित्रपटाचे शूटिंग लवकरच सुरू होणार असून, यात कोणते कलाकार प्रमुख भूमिकेत दिसणार, हे अद्याप गुलदस्त्यात आहे. मात्र, या चित्रपटासाठी चाहत्यांमध्ये मोठी उत्सुकता निर्माण झाली आहे.

आहे. हा चित्रपट लेफ्टनंट जनरल के. जे.एस. 'टायनी' ढिल्लो (रिटायर्ड) यांच्या 'ऑपरेशन सिंदूर: द अनटोल्ड स्टोरी ऑफ इंडियाज डीप स्ट्राइक्स इनसाइड पाकिस्तान' या पुस्तकावर आधारित आहे. या चित्रपटाचे दिग्दर्शन विवेक रंजन अग्निहोत्री करणार आहेत. भूषण कुमार

# अनुष्काचं कमबॅक ?



बॉलिवूड अभिनेत्री अनुष्का शर्मा गेल्या अनेक वर्षांपासून मोठ्या पडद्यापासून दूर आहे. २०१७ मध्ये शाहरुख खानसोबत 'झिरो' चित्रपटात दिसल्यानंतर अनुष्काने कौटुंबिक जबाबदाऱ्यांमुळे अभिनयातून ब्रेक घेतला होता. मात्र, आता अनुष्काच्या चाहत्यांसाठी एक मोठी आनंदाची बातमी समोर येत आहे. अनुष्का शर्मा चक्क दाक्षिणात्य सिनेसृष्टीतील 'पुष्पा' फेम अल्लू अर्जुनच्या चित्रपटातून कमबॅक करण्याची शक्यता वर्तवली जात आहे. झुलन गोस्वामी यांच्या जीवनावरील 'चकदा एक्सप्रेस' या चित्रपटातून अनुष्का कमबॅक करेल, अशी सर्वांना खात्री होती. या चित्रपटाचे शुटिंगही पूर्ण झाले होते, मात्र काही कारणास्तव हा प्रकल्प गेल्या अनेक वर्षांपासून रखडलेला आहे.

अशातच, 'डेक्कन क्रॉनिकल'च्या वृत्तानुसार, अनुष्का आता दाक्षिणात्य दिग्दर्शक टली याच्या आगामी बिग बजेट चित्रपटात दिसू शकते. या चित्रपटाला सध्या 'a22w-6' असे तात्पुरते नाव देण्यात आले आहे. विशेष म्हणजे, या चित्रपटात दाक्षिणात्य सुपरस्टार अल्लू अर्जुन आणि बॉलिवूडची टॉप अभिनेत्री दीपिका पादुकोण मुख्य भूमिकेत असणार आहेत.

जर अनुष्का शर्माने या चित्रपटासाठी होकार दिला, तर हे तिचा तेलुगू चित्रपटसृष्टीतील पहिला डेब्यू ठरेल.

अनुष्का शर्मा सध्या पती विराट कोहली आणि मुलगी वामिका आणि मुलगा 'अकाय' यांच्यासह लंडनमध्ये स्थायिक झाली आहे. ती शेवटची तृप्ती डिमरीच्या 'कला' या चित्रपटात एका छोट्या पाहुण्या भूमिकेत दिसली होती. आता ८ वर्षांच्या प्रदीर्घ प्रतीक्षेनंतर अनुष्का पुन्हा एकदा मुख्य भूमिकेत दिसणार का, याकडे चाहत्यांचे डोळे लागले आहेत.



# आज 'ती' खूश झाली असती!

बॉलिवूडचा प्रसिद्ध सिनेदिग्दर्शक बोनी कपूर अनेकदा सोशल मीडियाच्या माध्यमातून श्रीदेवीच्या आठवणींना उजाळा देत असतात. यात काही वेळा ते त्यांचे फोटो वा किस्से चाहत्यांसोबत शेअर करत असतात. यावेळी सुद्धा त्यांनी एक फोटो पोस्ट करत श्रीदेवी यांच्याविषयी भाष्य केलं आहे. विशेष म्हणजे या पोस्टच्या माध्यमातून त्यांनी दिवंगत अभिनेत्री श्रीदेवी यांची अपूर्ण राहिलेली इच्छा पूर्ण केली आहे. बोनी कपूर यांनी इन्स्टाग्रामवर त्यांचा स्वत:चा एक फोटो पोस्ट केला आहे. या फोटोमध्ये बोनी कपूर यांचं बॉडी ट्रान्सफॉर्मेशन झाल्याचं दिसून येत आहे. विशेष म्हणजे त्यांच्या या फोटोसोबत त्यांनी श्रीदेवीचा फोटो सुद्धा एडिट करुन अॅड केला आहे. त्यामुळे त्यांचा फोटो पाहून नेटकऱ्यांचे डोळे पाणावले आहेत. बोनी कपूर यांनी त्यांचं वजन प्रचंड घटवलं असून त्यांचा नवा अंदाज नेटकऱ्यांना पाहायला मिळतोय. त्यांनी त्यांच्या बॉडी ट्रान्सफॉर्मेशनचा फोटो पोस्ट केला आहे.

सोबतच त्यांनी दिलेलं कॅप्शन लक्षवेधी ठरत आहे. मला पूर्ण खात्री आहे. मला या रुपात पाहून श्री खूप खूश झाली असती, असं कॅप्शन त्यांनी या फोटोला दिलं आहे. बोनी कपूर यांनी त्यांच्या फिटनेसवर लक्ष द्यावं अशी श्रीदेवींची कायम इच्छा होती. यासाठी त्या सतत त्यांच्या मागे तगादाही लावायच्या. अभिनेत्री जान्हवी कपूर हिने एका मुलाखतीमध्ये श्रीदेवींच्या या इच्छाविषयी सांगितलं होतं. माझ्या वडिलांनी त्यांच्या हेल्थवर लक्ष द्यावं. ती सतत त्यांना डाएट करण्यासाठी, वॉकिंग करण्यासाठी प्रोत्साहन द्यायची, असं जान्हवीने म्हटलं होतं. दरम्यान, बोनी कपूर यांनी त्यांचं वजन घटवल्यानंतर त्यांच्या लूक आणि स्टाइलमध्येही खूप बदल झाला आहे. परंतु, त्यांच्यातील हा बदल त्यांनी पाहिल्यानंतर त्यांना श्रीदेवीची आठवण प्रकर्षाने जाणवत आहे. हे त्यांच्या पोस्टवरुन लक्षात येतं.





# ईशाच्या प्रेमात बादशहा वेडा !

दिग्दर्शक पंजाबी गायक आणि रॅपर बादशहा सध्या त्यांच्या वैयक्तिक आयुष्यामुळे चर्चेत आला आहे. बादशहाच्या लग्नाचे काही फोटो आणि व्हिडीओ सोशल मीडियावर तुफान व्हायरल झाले आहेत. बादशहानं पंजाबी अभिनेत्री ईशा रिख हिच्याशी गुपचुप लग्न उरकलं आहे. ईशाच्या आईने सोशल मीडियावर लग्नाचे काही 'इनसाइड' फोटो शेअर केलेत. बादशहाच्या लग्नाचे फोटो पाहून चाहत्यांना धक्का बसला. बादशहाच्या पत्नीबद्दल चाहत्यांमध्ये उत्सुकता वाढली असून ईशा रिखी नेमकी कोण? असा प्रश्न चाहते विचारत आहेत.

ईशा रिखी हि पंजाबी चित्रपटसृष्टीतील अभिनेत्री आहे. तिनं २०१३ मध्ये 'जट्ट बॉयज पुत्त जट्टां दे' या चित्रपटातून अभिनय क्षेत्रात पदार्पण केले. त्यानंतर तिने 'हॅप्पी गो लकी' (२०१४) आणि 'अरदास' (२०१६) या चित्रपटांमध्येही काम केले आहे. याशिवाय २०१८ मध्ये तिनं 'नवाबजादे' या चित्रपटातून बॉलिवूडमध्येही एन्ट्री केली. या चित्रपटात वरुण धवन, राघव जुयाल आणि पुनीत पाठक हे अभिनेते होते. अभिनयासोबतच ईशा रिखी यांनी अनेक म्युझिक व्हिडीओ आणि जाहिरातींमध्येही काम केले आहे. करिअरच्या सुरुवातीला तिनं मॉडेलिंग केली होती.

बादशहा आणि ईशा रिखी गेल्या ४ ते ५ वर्षांपासून एकमेकांना डेट करत असल्याच्या बातम्या येत होत्या. पण, बादशहाने ईशासोबतच्या नात्यावर कधीही उघडपणे भाष्य केले नव्हते. अगदी गेल्या वर्षी लग्नाच्या चर्चा रंगल्या तेव्हा बादशहाने त्या केवळ 'अफवा' असल्याचे म्हटले होते. बादशहाचं हे दुसर लग्न आहे. जॅस्मिन मसीह ही बादशहाची पहिली पत्नी होती. दोघांची ओळख सोशल मीडियावरून झाली आणि त्यानंतर त्यांनी २०१२ मध्ये लग्न केले होते. जवळपास आठ वर्षे एकत्र राहिल्यानंतर २०२० च्या सुमारास त्यांचा घटस्फोट झाला. बादशहा आणि जॅस्मिन या दोघांनीही अधिकृतपणे वेगळं होण्याचं नेमकं कारण सांगितलेलं नाही. मात्र, वैयक्तिक मतभेद आणि नात्यातील जुळवाजुळव न होणं ही कारणे असल्याचं बोललं जातं. स्वतः बादशहानेही काही मुलाखतींमध्ये नातं टिकवण्याचा प्रयत्न केला होता, असं सूचित केलं होतं.

बादशा सध्या सुमारे १२४ कोटी रुपयांच्या मालमत्तेचा मालक आहे. तो बॉलिवूडमधील सर्वात जास्त मानधन घेणार्या आणि यशस्वी कलाकारांपैकी एक आहे. बादशहा प्रत्येक गाण्यासाठी आणि लाईव्ह शोसाठी मोठी रक्कम आकारतो. त्याच्याकडे दिल्ली, चंदीगड आणि मुंबईत कोट्यवधींचे आलिशान घर आहे. याव्यतिरिक्त, त्याच्याकडे RollrRyobe, Lamborghini, Porrbhe यांसारख्या महागड्या गाड्यांचे कलेक्शन आहे.

# राजकुमारच्या 'टोस्टर'ची रिलीज डेट जाहिर



बॉलीवूड अभिनेता राजकुमार राव नेहमी त्याच्या चाहत्यांना काहीतरी नवं देण्याचे काम त्याच्या चित्रपटातून करत असतो. तो आगामी 'टोस्टर' या कॅामेडी चित्रपटातून प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. गेल्या काही दिवसांपूर्वीच या चित्रपटाचा टीझर समोर आला होता. टीझरने चाहत्यांची उत्सुकता वाढवली होती.

अखेर चित्रपटाची रिलीज डेट समोर आली आहे. तसेच हा चित्रपट चित्रपटगृहात नाही तर ओटीटी प्लॅटफॅार्मवर रिलीज करण्यात येणार असल्याचे जाहीर करण्यात आले आहे. या चित्रपटात राजकुमारसोबत अभिनेत्री सान्या मल्होत्रा स्क्रिन शेअर करताना दिसणार आहे.

हा चित्रपटात १५ एप्रिल या दिवशी नेटफ्लिक्स या ओटीटी माध्यमावर रिलीज होणार असून, निर्मात्यांनी याबद्दचा एक व्हिडिओ शेअर केला आहे. या व्हिडिओमध्ये राजकुमार राव असून, त्याने आपला 'टोस्टर' हा चित्रपट १५ एप्रिल रोजी नेटफ्लिक्सवर येत असल्याची घोषणा केली आहे.

आपल्या भूमिकेबद्दल आणि उर्वरित कलाकारांविषयीही त्याने माहिती दिली आहे. या चित्रपटात राजकुमार रावने रमाकांत नावाच्या एका कंजूष व्यक्तीची भूमिका साकारली आहे. कॅप्शनमध्ये निर्मात्यांनी म्हटले आहे, ही एक सुपर-टोस्टी कॉमेडी असणार आहे. व्हिडिओमध्ये राजकुमार रावला एक मोनोलॉग (एकपात्री संवाद) सादर करण्यास सांगितले जाते आणि त्याला एक स्क्रिप्ट दिली जाते. मात्र, राजकुमार म्हणतो की प्रत्येक वेळी मोनोलॉग सादर करणे आवश्यक नाही. त्यामुळे तो व्हिडिओतून फक्त चित्रपटाच्या प्रदर्शनाची तारीख आणि कलाकारांविषयी संपूर्ण माहिती देतो. राजकुमार राव आणि सान्या मल्होत्रा यांच्या व्यतिरिक्त फराह खान, अभिषेक बॅनर्जी, अर्चना पुरण सिंग, सीमा पाहवा आणि जितेंद्र जोशी अशी दमदार कास्ट बघायला मिळणार आहे. या चित्रपटाचे दिग्दर्शन विवेक दास चौधरी यांनी केले आहे. चाहते राजकुमारला एका नवीन भूमिकेत पाहण्यासाठी फार उत्सुक आहेत. ते या चित्रपटाची आतुरतेने वाट पाहत आहेत.

# ट्रोलिंगचा मला खूप त्रास व्हायचा

दाक्षिणात्य कलाविश्वातील लोकप्रिय अभिनेत्री श्रीलीला गेल्या काही दिवसांपासून सातत्याने सोशल मीडियावर चर्चेत येत आहे. तेलुगू इंडस्ट्रीत हक्काचं स्थान मिळवणारी श्रीलीला लवकरच 'उस्ताद भगत सिंग' या सिनेमात झळकणार आहे. या सिनेमात ती अभिनेता पवन कल्याणसोबत स्क्रीन शेअर करणार आहे. सध्या लोकप्रियतेच्या शिखरावर असलेल्या या अभिनेत्रीला सुरुवातीच्या काळात बराच स्ट्रगल करावा लागला. अनेकदा तिला ट्रोलिंगचा समाना करावा लागला. या ट्रोलिंगविषयी तिने नुकतंच तिचं मत मांडलं आहे.

श्रीलीलाने अलिकडेच सुमा कनकवाला यांच्या 'द रील फ्लेवर' या चॅट शोमध्ये हजेरी लावली होती. यावेळी तिने सुरुवातीच्या काळात ट्रोलिंग झाल्यावर तिची अवस्था कशी व्हायची हे सांगितलं. जेव्हा मी इंडस्ट्रीत नवीन होते. तेव्हा मला या ट्रोलिंगचा खूप त्रास व्हायचा. मला प्रचंड वाईट वाटायचं आणि मी रडायचे. मला हे सगळं जमणार नाही, असं मी सतत माझ्या आईला म्हणायचे. त्यामुळे मी परत शाळेत किंवा कॉलेजला जाऊ का? असंही विचारायचे. मी फार भावनिक होते. परंतु, आता मला या ट्रोलिंगचा काहीही फरक पडत नाही, असं श्रीलीला म्हणाली. पुढे ती म्हणते, सुरुवातीला माझ्या मनात सतत इंडस्ट्री सोडायचा विचार यायचा. पण, जसजशी वेळ पुढे सरकत गेली. मी या सगळ्याकडे दुर्लक्ष करायला सुरुवात केली. मला वाटते की, आजकालच्या लोकांमधील विचारसरणी आता बदलली आहे. नकारात्मकता दिसली की ते त्या गोष्टीचा कमी विचार करतात. त्यामुळे पूर्वीपेक्षा आता लोक जास्त शहाणी झाली आहेत. म्हणूनच, ते योग्य गोष्टींचा विचार करतात. दरम्यान, ती 'उस्ताद भगत सिंग' या सिनेमा बरोबरच ती एका बॉलिवूड सिनेमातही झळकणार आहे. या सिनेमात ती अभिनेता कार्तिक आर्यनसोबत स्क्रीन शेअर करणार आहे. सुरुवातीला या चित्रपटाचे नाव 'आशिकी ३' असे असल्याचं म्हटलं जात होतं. मात्र, आता या चित्रपटाचं नवीन नाव 'तू मेरी जिंदगी है' असे ठेवण्यात आलं आहे. मात्र, याबाबत अद्याप अधिकृत घोषणा करण्यात आलेली नाही. होता. मी त्यांना सांगितलं होतं की अशी गाणी चालणार नाहीत आणि सेन्सॉर होतील. पण त्यांनी मला फक्त कन्नड व्हर्जनचं ट्रान्सलेशन करून देण्यास सांगितलं. 'चूसेगा', 'चाटेगा' यांसारखे शब्द मूळ गाण्यातच होते.





# इंडस्ट्रीमध्ये सगळ्यांची हीच अवस्था

कलाविश्वात कलाकारांच्या प्रोफेशनल लाइफसोबतच पर्सनल आयुष्याचीही कायम चर्चा रंगत असते. यात खासकरुन त्यांची लव्ह लाइफ सर्वाधिक चर्चेचा विषय ठरत असते. दाक्षिणात्य अभिनेत्री श्रुती हासन बऱ्याचदा तिच्या लव्हलाइफमुळे चर्चेत आली आहे. आतापर्यंत तिचं नाव अनेक दिग्गज अभिनेत्यांसोबत जोडलं गेलं आहे. या सगळ्यावर अलिकडेच तिने प्रतिक्रिया दिली आहे. इतकंच नाही तर प्रेम प्रकरण हे इंडस्ट्रीसाठी नवीन नाही. आणि, इथे सगळ्यांची अशीच अवस्था आहे, असंही तिने यावेळी म्हटलं आहे.

अलिकडेच श्रुतीने एक मुलाखत दिली. या मुलाखतीमध्ये तिला तिच्या लव्ह लाइफविषयी काही प्रश्न विचारण्यात आले. 'प्रेमात वारंवार अपयश का येत?' असा प्रश्न तिला विचारण्यात आला. यावर, तिने तिचं मत मांडलं. माझी लव्ह लाइफ डेपस ऊर्ळीरपलश ची असते. कधी गाण्याचं चित्रीकरण असतं. तर कधी सिनेमाचं. यातून जेव्हा कधी ब्रेक मिळतो त्यावेळी समोरच्या व्यक्तीला त्याचं वैयक्तिक आयुष्य जगायचं असतं. हे बघा, खरं पाहायला गेलं तर इंडस्ट्रीत जवळपास सगळ्याची हिच अवस्था आहे, असं श्रुती म्हणाली.

पुढे ती म्हणते, ज्यावेळी मी एखाद्याच्या प्रेमात पडते त्यावेळी एकदम टिपिकल संस्कारी मुलगी होते. मी माझ्या पार्टनरला प्रेमाने जेवण भरवते. त्याच्यावर मनापासून प्रेम करते. जर त्याला ताप आला असेल तर त्याची खूप काळजी घेते. पण, मी हे त्याच्याचसाठी करते ज्याला माझ्या या भावनांची किंमत आहे. आदर आहे. श्रुतीने या मुलाखतीमध्ये ती कोणाला डेट करते या प्रश्नाचं उत्तर देणं मात्र टाळलं. परंतु, जर कोणाला डेट करायची वेळ आली तर तेलुगू मुलाला डेट करेन असं ती म्हणाली. तेलुगू मला नीट बोलता येत नाही. त्यामुळे जर तेलुगू मुलाला डेट केलं तर माझी भाषा नक्कीच सुधारेल असं ती यावेळी म्हणाली. दरम्यान, मागच्या वर्षी श्रुती 'कुली' या सिनेमात झळकली होती. त्यानंतर आता ती 'ट्रेन', 'सालार २' या सिनेमात झळकणार आहे.



# दाक्षिणात्य सिनेमात सहा वर्षानंतर दिसणार तब्बू

बॉलीवूडमधील काही दर्जेदार अभिनेत्रींपैकी एक म्हणजे तब्बू. आपल्या अभिनयाने चर्चेत राहणाऱ्या तब्बूने हिंदीच नाही तर मराठी आणि साऊथ चित्रपटांमध्येही अभिनय केला आहे. तब्बू कायम तिच्या विविध धाटणीच्या चित्रपटांसाठी ओळखली जाते. शेवटची ती क्रू सिनेमात पाहायला मिळाली. या चित्रपटाला प्रेक्षकांचा खूप चांगला प्रतिसाद मिळाला. त्यानंतर आता लवकरच तब्बू भूत बंगला या सिनेमातून प्रेक्षकांचं मनोरंजन करण्यास सज्ज झाली आहे.

अभिनेता अक्षय कुमारसोबत ती या चित्रपटात एकत्र स्क्रीन शेअर करणार आहेत. दरम्यान, या चित्रपटाच्या प्रदर्शनापूर्वीच अभिनेत्रीचं नशीब फळफळलं आहे. तब्बूची एका दाक्षिणात्य चित्रपटात वर्णी लागल्याची माहिती मिळते आहे. जवळपास सहा वर्षानंतर तब्बू दाक्षिणात्य सिनेमात झळकणार आहे. मिडिया रिपोर्टनुसार, तब्बू एका नवीन पॅन-इंडिया प्रोजेक्टद्वारे दाक्षिणात्य चित्रपटसृष्टीत पुनरागमन करण्यास सज्ज झाली आहे. या बिग बजेट प्रोजेक्टसाठी अभिनेत्रीला अप्रोच करण्यात आल्याचं सांगण्यात येत आहे. दरम्यान, या प्रोजेक्टमध्ये तब्बू दाक्षिणात्य सुपरस्टार अभिनेता विजय सेतुपतीसोबत पहिल्यांदाच स्क्रिन शेअर करताना दिसणार आहे. त्यामुळे तिचे चाहते देखील प्रचंड उत्सुक आहेत. मात्र, अद्याप याबाबत तब्बूने स्वत कोणतीही अधिकृत माहिती दिलेली नाही. मिळालेल्या माहितीनुसार, तब्बूने प्रसिद्ध निर्माते पुरी जग्गनाथ यांच्यासोबत हात मिळवणी केली असून 'स्लम डॉग ३३ टेम्पल रोड' या त्यांच्या आगामी प्रोजेक्टमध्ये ती झळकणार आहे. या चित्रपटात विजय सेतुपती आणि संयुक्ता यांच्याही प्रमुख भूमिका आहेत. चित्रपट सध्या पोस्ट- प्रॉडक्शनमध्ये आहे. मिळालेल्या माहितीनुसार, हा चित्रपट या वर्षा अखेरीस प्रदर्शित होण्याची शक्यता आहे.

# 'राजा शिवाजी'त जिनिलीया साकारणार 'ही' भूमिका





रितेश देशमुख दिग्दर्शित 'राजा शिवाजी' चित्रपट येत्या १ मे रोजी संपूर्ण देशभरात प्रदर्शित होणार आहे. गेल्या अनेक वर्षांपासून रितेश या चित्रपटासाठी रात्रंदिवस मेहनत घेत असल्याचं पाहायला मिळतंय. 'राजा शिवाजी' चित्रपटाचं संपूर्ण शूटिंग पूर्ण झाल्यावर रितेशने सोशल मीडियावर भावनिक पोस्ट शेअर केली होती. आता या सिनेमाची पहिली झलक टीझरच्या स्वरुपात प्रेक्षकांच्या भेटीला आली आहे. 'धुरंधर २'च्या स्क्रिनिंग दरम्यान प्रेक्षकांना रितेशच्या 'राजा शिवाजी' सिनेमाचा जबरदस्त ट्रेलर पाहायला मिळतो. १ मे २०२६ रोजी हा सिनेमा एकूण ६ भाषांमध्ये प्रदर्शित होईल. दमदार संवाद, हिंदवी स्वराज्य, छत्रपती शिवाजी महाराजांची युद्धनीती याची झलक प्रेक्षकांना या टीझरमध्ये पाहायला मिळतेय. याशिवाय 'राजा शिवाजी'मध्ये कोणते कलाकार कोणत्या भूमिकेत झळकणार आहेत हे सुद्धा या टीझरच्या माध्यमातून स्पष्ट झालं आहे. संजय दत्त, अभिषेक बच्चन, महेश मांजरेकर, सचिन खेडेकर, भाग्यश्री, फरदीन खान, जितेंद्र जोशी, अमोल गुप्ते, विद्या बालन अशा दिग्गज कलाकारांची या सिनेमात मांदियाळी आहे. रितेश देशमुख यामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांची भूमिका साकारणार आहे. याचा पहिला लूक पाहून नेटकरी थक्क झाले आहेत. तर, त्याची पत्नी जिनिलीया देशमुख या सिनेमात सईबाईंच्या भूमिकेत झळकणार आहे. 'राजा शिवाजी' सिनेमातील जिनिलीयाचा मराठमोळा लूक, तिचे संवाद टीझरमध्ये लक्ष वेधून घेतात. तर, शहाजीराजे भोसलेंच्या भूमिकेत अभिनेते महेश मांजरेकर आणि राजमाता जिजाऊंची भूमिका अभिनेत्री भाग्यश्री साकारणार आहे. याशिवाय अभिषेक बच्चन संभाजीराजे शहाजीराजे भोसले यांच्या भूमिकेत झळकताना दिसेल. 'राजा शिवाजी' चित्रपटाला अजय- अतुल यांचं संगीत लाभलं आहे. टीझरच्या शेवटी बॅकग्राऊंडला वाजणारं छत्रपती गाणं सर्वांचं लक्ष वेधून घेतं. त्यामुळे 'राजा शिवाजी' सिनेमाचं संगीत प्रेक्षकांसाठी मोठी पर्वणी ठरेल. दरम्यान, 'राजा शिवाजी' चित्रपटाचं दिग्दर्शन रितेश देशमुखने स्वत: केलं असून, याची निर्मिती ज्योती देशपांडे व जिनिलीया देशमुख यांनी केली आहे. १ मे रोजी हा चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येईल.



# हेमंत ढोमेचे चाहत्यांना सरप्राइज

'क्रांतिज्योती विद्यालय मराठी माध्यम' चित्रपटाच्या यशानंतर हेमंत ढोमे 'झिम्मा'चा तिसरा भाग घेऊन प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. २१ मार्च रोजी वाढदिवसानिमित्त हेमंतने झिम्मा ३' चित्रपटाचे पोस्टर शेअर करत त्याने रिलीज डेटही जाहीर केली आहे. या पोस्टरमध्ये चित्रपटाचा अभिनेता सिद्धार्थ चांदेकर दिसत आहे. एका नवीन लोकेशन सोबत सिद्धार्थ ट्रिप प्लान करणार आहे. पोस्टरमध्ये सिद्धार्थ चांदेकर एका समुद्रकिनारी डोक्याला हात लावून उभा असलेला पाहायला मिळत आहे. तर त्याच्या आजूबाजूला बॅग्स दिसत आहेत.


'झिम्मा ३'च्या नवीन पोस्टरला खास कॅप्शन देत लिहिलं की, आपला आनंदाचा खेळ 'यावेळी तिसराच आहे'! झिम्मा ३ चित्रपटाच्या या पोस्टवर चाहत्यांसह कलाकार मंडळीकडून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. 'झिम्मा ३' चित्रपट १ जानेवारी २०२७ ला थिएटरमध्ये रिलीज होणार आहे. नवीन वर्षात पुन्हा एकदा झिम्माचा खेळ रंगणार आहे. 'झिम्मा ३' चित्रपटाचे दिग्दर्शन आणि लेखन हेमंत ढोमे यांचे आहे. तर निर्मिती क्षिती जोगची आहे. 'झिम्मा' फ्रेंचायझीचा हा तिसरा भाग असून 'झिम्मा' २०२१ ला थिएटरमध्ये रिलीज झाला होता आणि 'झिम्मा २' चित्रपट २०२३ ला प्रेक्षकांच्या भेटीला आला होता. दोन्ही चित्रपटांनी बॉक्स ऑफिसवर चांगली कमाई केली होती. आता 'झिम्मा ३' चित्रपटाकडूनही चाहत्यांना मोठी अपेक्षा आहे.

# 'वाजले की बारा'साठी अमृताला मिळालं होतं 'इतकं' मानधन



मराठी सिनेजगतात लावणीप्रधान सिनेमांचा एक तगडा फॅनबेस आहे. गाजलेल्या लावण्यांमध्ये एक लावणी जगभर प्रसिद्ध आहे, ती म्हणजे 'मला जाऊ द्या ना घरी, आता वाजले की बारा...'. संगीतकार अजय- अतुल यांनी संगीतबद्ध केलेली, गुरू ठाकूर यांच्या लेखणीतून अवतरलेली आणि बेला शेंडेंच्या आवाजातील ही लावणी प्रचंड गाजली. 'नटरंग' या मराठी चित्रपटातील या लावणीवर मराठी कलाविश्वाची 'चंद्रमुखी' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या अमृता खानविलकरने अफलातून नृत्य सादर करून लाखो प्रेक्षकांचे मन जिंकले होते. पण, तुम्हाला माहितीये का? या लावणीसाठी अमृताला किती मानधन मिळालं होतं?. एका मुलाखतीत अमृताने या गाण्याच्या शूटिंगचा अनुभव आणि तिला मिळालेल्या मानधनाबद्दल खुलासा केला आहे. अमृता म्हणाली, आम्ही हे गाणं दोन रात्रीत शूट केलं होतं. हे गाणं तू करशील का? असं विचारण्यासाठी मला रात्री दहा वाजता फोन आला होता आणि मी सुद्धा त्यांना 'हो' म्हटलं होतं. मला या गाण्यासाठी तेव्हा ३० हजार रुपये मानधन मिळालं होतं. मानधनापेक्षा या गाण्याने दिलेल्या लोकप्रियतेबद्दल अमृता अधिक भरभरून बोलली. ती म्हणाली, एक गोष्ट मी आवर्जून सांगेन, या गाण्यामुळे माझं आयुष्य बदललं. मी अशा ठिकाणीही परफॉर्म केलं आहे, जिथे वीज नव्हती, तरीही लोक फक्त हा डान्स पाहण्यासाठी गर्दी करायचे. अगदी १० दिवसांपूर्वी 'Nubleya' च्या कॉन्सर्टमध्येही हे गाणं वाजलं, यावरूनच त्याची जागतिक क्रेझ लक्षात येते. १० हजार लोकांसमोर परफॉर्म करण्याची संधी याच गाण्यामुळे मिळाल्याचे तिने नमूद केले. अनेकजण अमृताच्या ऊर्जेचं कौतुक करतात, त्यावर भाष्य करताना ती म्हणाली, मी कोणतीही प्रोफेशनल ट्रेंड डान्सर नाहीये. मी नेहमी माझ्या दिग्दर्शकाचं आणि कोरिओग्राफरचं ऐकते. अनेक लोक विचारतात तुझी एनर्जी कमाल आहे, ती कधीच कमी होत नाही. माझी डान्समधील एनर्जी ही सर्व देवाची कृपा आणि त्याचं वरदान आहे.

# सुरेल संगीताचा आनंदयात्री: सचिन देव बर्मन



१९५८ 'बाबू समझो इशारे...' 'चलती का नाम गाडी'तील हा प्रसंग! तीन भावंडांचा गाडी चालवितानाचा विनोदी व कलात्मक प्रकार अन् सचिनदांनी विनोदाला साजेसे दिलेले विनोदी संगीत. यामुळे हे गाणे कलात्मक ठरले. संगीतकारामुळे प्रसंग अजरामर झाला. 'इक लडकी भीगी भागीसी...' धुवाधार पावसाच्या मध्यरात्री गॅरेजच्या दारात उभी ठाकलेल्या मधुबालाला पाहून किशोरकुमारची अवस्था खुळ्यागत होते. गाडी दुरुस्त करताना गाडीचा आवाज, स्क्रू ड्रायवर, पाना-हातोड्यांच्या आवाजात किशोर यांच्या गमतीदार छेडछाडीच्या आवाजाचा मिश्र परिणाम साधून हे गाणे अनोख्या प्रकारात बांधले. 'जीवन के सफर मे राही, मिलते है बिछड जानेको...'

१९५७ सालच्या 'मुनीमजी' चित्रपटातील हे जीवनाचे तत्त्वज्ञान मस्तीभऱ्या अंदाजात सांगणारे गाणे किशोर कुमार यांनी त्यांच्या युडलिंगने सुरू केले. मंत्रमुग्ध करणार्या टवटवीत चेहऱ्याच्या नलिनी जयवंतचा लटका राग घालविण्याच्या प्रयत्नात देवानंद हे गाणे म्हणतात. किशोर कुमारच्या ठसठशीत स्वरांची उड्डाण सचिनदांनी अक्षरशः बहरवली. 'काटोसे खिचके ये आचल तोडके बंधन बांधे पायल...' एसडींनी गाण्याचा चेहराच असा बांधला की पडद्यावर वहिदा स्वतंत्र होऊन बंधन झुगारून दिल्याचा निर्देश देते. आयुष्यातील निरसतेचा स्फोट करून मुक्ततेचा आनंद दर्शविते. संगीतकाराच्या पाऊलखुणा गाण्यात उमटतात. हे श्रेष्ठ संगीतकाराचे लक्षण आहे.

'रिमझिम के तराने लेके आयी बरसात..' प्रेमप्रपातात मनसोक्त डुंबलेल्या देवानंद व वहिदा यांच्यावर चित्रित १९५९ सालच्या 'कालाबाजार'चे हे पावसाळी गाणे. शैलेंद्र यांच्या कल्पनेला आलेली लहर प्रणयी मूडमध्ये साकारली. अशी गाणी म्हणजे सदाबहार देवानंद यांचा प्रांत. मोहम्मद रफी व गीता दत्त यांच्या स्वरांचा स्वैर संचार,

ये रात ये चांदनी फिर कहाँ...' सागर किनारी चांदण्या रात्री प्रणयाचे स्वप्न साहिरच्या शब्दात साकारण्यासाठी सचिन देव बर्मन यांनी नुसत्या हमिंगमधून आकाशालाही गवसणी घालणारे हेमंतकुमार निवडले. सुरुवातीची आलापी जणू निद्रिस्त आकाशाला जागे करण्यासाठीच होती. सागराच्या अद्भुत गाजेच्या साथीत एसडींचे जादुई संगीत. तरण्याबांड देवानंदच्या हृदयाची तार आपल्या हुंकारातून छेडणाऱ्या हेमंतकुमारच्या आवाजातील हे सदाबहार गाणे चित्रपटसृष्टीला देण ठरले. 'थंडी हवाये, लहराके आये...' १९५१ सालच्या 'नौजवान' चित्रपटात रुपगर्विता नलिनी जयवंतवर चित्रित या यमन रागात बांधलेल्या गाण्यात आनंदाच्या अंगडाईत शीतल, शांत हवेच्या झोकात लताच्या मधुर आवाजाने नलिनी यांच्या अंतरंगात जणू प्रीतीची स्पंदणे उसळल्याचे प्रतीत होते.

पाऊससरींची हिंदम पकडून बासरीच्या मुलायम स्वरांच्या, सतारीच्या धुंद स्वरांच्या व ढोलकच्या साथीत सचिनदेव यांनी धुंद प्रेमासाठीच जणू ही धून तयार केली. 'पूछो ना कैसे मैने रैन बितायी...' सचिनदा शब्दप्रधान गायकीसाठी आवर्जून शैलेंद्र यांचे काव्य घ्यायचे. हिंदीतील भाषाप्रभू शैलेंद्रचे शब्द संगीतप्रभू सचिनदा तेवढ्याच कौशल्याने बोलके करायचे. 'मेरी सुरत तेरी आखे' या १९६३ सालच्या सिनेमातील वरील गाणे म्हणजे एका कुरूप जन्मान्धाची कर्मकहाणी दादामुनी यांनी उत्कृष्ट अदाकारीत अभिनित केली.

मला मराठीतील एका काव्यातील दोन ओळी आठवल्या... 'सांगा हो मजला प्रकाश म्हणता कोण्या तुम्ही वस्तूला। दृष्टीचे सुखही मला समजले नाही कसे आजला।।' हे काव्य ऐकताना जी अवस्था होते तशीच अवस्था वरील गाणे ऐकताना होते. अहिरभैरव रागात मन्ना डे यांच्या सुरात व कडव्यांच्या मधील बासरीच्या सुरावटीत हे गाणे सुश्राव्य झाले. 'रात अकेली है, बुझ गये दिये...' आशा भोसले यांच्या मादक व मस्तीभऱ्या सुरांचा अनुनय तनुजा या अभिनेत्रीने 'ज्वेल थिफ' चित्रपटात सादर करून योग्य न्याय दिला. 'जो भी चाहे कहिये' हे परवलीचे शब्द दृतात लांबविलेल्या बुलंद स्वरांचा वापर करून परिणाम साधला. 'देखी जमाने की यारी बिछडे सभी बारी बारी' 'कागज के फूल' चित्रपटात कथेचे सार कथन करणाऱ्या या गाण्याला संगीताची मेहरफ बसविणे जिकिरीचे काम होते.

रफी यांच्या संथ सुरुवातीने छायाचित्रणाच्या व कॅमेऱ्याच्या साथीला दिलेले गाण्यातील पार्श्वसंगीत, अफलातून आहे. 'उड जा उड जा प्यासे भवरे...' जर्जर अवस्थेत गुरुदत्त यांना वहिदा ओळखतात, पण चाहत्यांच्या गराड्यात विसरून जातात. तेव्हा गुरुदत्त खेदाने गातात... 'ये खेल है कबसे जारी बिछडे सभी' हे सर्व कथानकातील प्रयोग कसलेले संगीतकारच करू शकतात. गुरुदत्त यांच्या 'प्यासा' चित्रपटाचे संगीतही सचिनदांनी अशाच कौशल्याने अजरामर केले आहे. 'रूप तेरा मस्ताना प्यार मेरा दिवाना...'

१९६९ च्या 'आराधना' चित्रपटातले प्रणयाच्या परिणितीनंतरच्या मिलनोत्सुक क्षणाच्या आतुरतेच्या प्रसंगावर किशोरकुमारकडून प्रत्येक शब्दांनंतर पॉज घेऊन थोड्या दबल्या स्वरात अभिनवरीतीने गाऊन घेतले. 'ओ जानेवाले हो सके तो...' 'बंदिनी' सिनेमात गगनाचा वेध घेणारा मुकेश यांच्या विरह व्याकुळ स्वरांचा सार्थ उपयोग केला. 'ओ रे माझी... ले चल पार' हे गाणेही स्वतःच्या स्वरात लोकगीताच्या स्वरूपात सादर केले. आकाशातील अनेक रहस्ये जाणून घेणारी दर्यावर्दी गाणी बालपणी अन्वर नावाच्या मच्छिमाराकडून शिकले. त्यांनी अशा प्रकारची सात गाणी सिनेमात गायली.

१ ऑक्टोबर १९०६ रोजी त्रिपुरा येथील राजघराण्यात सचिन देव बर्मन यांचा जन्म झाला. संगीताची आवड बालपणापासूनच होती. १९४४ साली मुंबईत आले. पहिला चित्रपट होता 'शिकारी.' १९४६ सालच्या 'दो भाई' सिनेमापासून प्रसिद्धीस आले. १९५१ सालच्या 'बाजी' चित्रपटात त्या आधीच्या चित्रपटातील गाण्यांचे सर्व रेकॉर्ड मोडले. हिंदी व बंगाली मिळून १०० च्या वर चित्रपटांना संगीत दिले. फिल्मफेअर पुरस्कार : १९५४ टॅक्सी ड्राइवर, १९७३ अभिमान. राष्ट्रीय पुरस्कार : १९६९ आराधना. पद्मश्री पुरस्कार : १९६९. ३१ ऑक्टोबर १९७५ रोजी भूतलावरील संगीत सेवा आटोपून इंद्रलोकी दरबारात रुजू झाले. 'तुम न जाने किस जहा में खो गये...'

**रमेश पोफळी**

# संसार से भागे फिरते हो...

प्रख्यात निर्माते ए. के. नडियाडवाला यांनी १९६४ साली निर्माण केलेल्या 'चित्रलेखा' या चित्रपटाचे दिग्दर्शन किदार शर्मा यांनी केले होते. या चित्रपटात अशोक कुमार, मीना कुमारी आणि प्रदीप कुमार अशा बड्या कलावंतांचे त्रिकूट एकत्र आले होते. तसे हे तीन कलावंत 'आरती, 'भीगी रात' आणि 'बहुबेगम' या तीन चित्रपटांमध्येही चमकले होते. 'चित्रलेखा'मध्ये मेहमूद, अचला सचदेव, मीनू मुमताज, बेला बोस, झेबरहमान, नरेंद्र वर्मा, नसीम, रेहाना, शोभना, कनक, अल्ताफ आदी सहकलाकार होते. कथा राजनर्तकीभोवती फिरत असल्यामुळे यात स्त्री कलावंतांची संख्या अधिक होती.

चित्रपट ऐतिहासिक पृष्ठभूमीवरील कथेवर आधारला असल्याने गीते साहिर लुधियानवी यांनी लिहिली होती तर स्वत:ची वेगळी शैली असणारे संगीत दिग्दर्शक रोशन (रोशन लाल नागरथ) यांच्यावर संगीताची जबाबदारी सोपविण्यात आली होती. या चित्रपटात दाखविल्या प्रमाणे आर्यपुत्र सामंत बीजगुप्तचा (प्रदीप कुमार) विवाह यशोधराशी (शोभना) ठरलेला असूनही तो तिच्याकडे दुर्लक्ष करून राजनर्तकी चित्रलेखाकडे (मीना कुमारी) आकृष्ट होतो. ते पाहून यशोधराचे पिता मृत्युंजय हे योगी कुमारगिरी (अशोक कुमार) यांना पाचारण करतात. योगी चित्रलेखाची कानउघाडणी करून बीजगुप्तला आपल्या मोहपाशापासून दूर करावयास सांगतात. नंतर एक वेळ अशी येते की, योगीच चित्रलेखाच्या मोहपाशात गुरफटले जाऊन त्यांचा नैतिक अध:पात होतो. या चित्रपटातील 'संसार से भागे फिरते हो' हे लता मंगेशकर यांनी गायिलेले अत्यंत लोकप्रिय गीत



चित्रलेखावर (मीना कुमारी) चित्रित झाले आहे. त्यात योगी कुमारगिरी (अशोक कुमार) यांचाही समावेश आहे. चित्रलेखा कुमारगिरीचे वाभाडे काढताना म्हणते, जगापासून दूर पळणाऱ्या माणसा, तुला परमेश्वर भेटेल तरी कसा? इहलोकाला जर तुला आपलेसे करून घेता येत नसेल तर परलोकातही तुझ्यावर पश्चात्ताप करण्याचीच पाळी ओढवेल! पाप म्हणजे काय आणि पुण्य तरी कशाला म्हणतात? हे म्हणजे रीतिरिवाजांवर उमटविलेले धर्माचे शिक्के आहेत. हा भोगवाद म्हणजेही एक तपस्याच आहे; पण तू सर्वत्यागी असल्यामुळे तुला ते समजावे तरी कसे? प्रतिभावंत गीतकार साहिर लुधियानवी यांची मातृभाषा उर्दू; पण या चित्रपटाच्या कथेची मौर्य साम्राज्यकालीन पृष्ठभूमी लक्षात घेऊन त्यांनी या गीतात उर्दूचा एक शब्दही न वापरता ते संस्कृतप्रचुर हिंदीत लिहिले आहे, हे कौतुकास्पद!

संगीतकार रोशन यांनी यमन कल्याण रागावर आधारलेल्या सुश्राव्य चालीत सतार, सरोद व सोलो व्हायोलिन या वाद्यांचा केलेला वापर पूर्वीच्या राजघराण्यांच्या काळातील वातावरणनिर्मिती करतो. या गीताच्या ओळी पुढीलप्रमाणे : 'संसार से भागे फिरते हो भगवान को तुम क्या पाओगे इस लोक को भी अपना न सके उस लोक में भी पछताओगे ये पाप है क्या ये पुण्य है क्या रीतों पर धर्म की मोहरें हैं हर युग में बदलते धर्मों को कैसे आदर्श बनाओगे ये भोग भी एक तपस्या है तुम त्याग के मारे क्या जानो अपमान रचेता का होगा रचना को अगर ठुकराओग

**अनिल रा. तोरण**



# इमरान हाश्मीचा आवारापन २ येतोय!

आवारापन या सिनेमात इमरान हाश्मी व श्रेया शरण हे कलाकार प्रमुख भूमिकांत दिसले होते. मोहित सुरी यांनी या चित्रपटाचे दिग्दर्शन केले होते. या सिनेमाला प्रेक्षकांचा उत्तम प्रतिसाद मिळाला होता. तसेच, इमरान हाश्मी व श्रेया शरण यांच्या जोडीलादेखील प्रेक्षकांची पसंती मिळाली होती. आता या सिनेमाची चर्चा होण्याचे कारण म्हणजे १९ वर्षांनंतर चित्रपटाचा दुसरा भाग प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. आवारापन २ हा सिनेमा लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.

या चित्रपटाचा फर्स्ट लूक नुकताच प्रदर्शित केला आहे. मुदस्सर खान त्यांनी त्यांच्या सोशल मीडियावर 'आवारापन २'ची झलक दाखविणारा, फर्स्ट लूकचा व्हिडीओ शेअर केला आहे. नितीन कक्कर यांनी या सिनेमाचे दिग्दर्शन केले आहे. मुकेश भट्ट या सिनेमाची निर्मिती करीत आहेत. हा व्हिडीओ पाहिल्यानंतर नेटकऱ्यांनी कमेंट्स करत सिनेमा पाहण्यास उत्सुक असल्याचे लिहिले आहे. तसेच, इमरान हाश्मीला पुन्हा एकदा शिवम या भूमिकेत पाहण्यास आवडेल, असेही लिहिले आहे. तर अनेकांनी, आवारापन या चित्रपटाबरोबर अनेक आठवणी जोडल्या आहेत, असे लिहिले आहे. इमरान हाश्मीबरोबर या चित्रपटात दिशा पाटनीही प्रमुख भूमिकेत दिसणार आहे. या दोघांबरोबर आणखी कोणते कलाकार या 'आवारापन २'मध्ये दिसणार ते पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

३ एप्रिल २०२६ रोजी सिनेमा थिएटरमध्ये प्रदर्शित होणार आहे. आता प्रेक्षक या सिनेमाला कसा प्रतिसाद देणार हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. दरम्यान, याआधी त्याचा 'हक' हा सिनेमा प्रदर्शित झाला होता. या सिनेमाची मोठ्या प्रमाणात चर्चा झाली. अभिनेत्री यामी गौतम या सिनेमात प्रमुख भूमिकेत दिसली होती.

# घटस्फोटानंतरही एक्स पत्नीबरोबर प्रियदर्शन



मराठी इंडस्ट्रीत असे अनेक कलाकार आहेत, जे कित्येक वर्षांपासून एकमेकांबरोबर सुखाचा संसार करत आहेत. तर, असेही काही कलाकार आहेत, ज्यांनी काही कारणांमुळे अर्ध्यातच एकमेकांची साथ सोडली आहे. तसेच, काही असेही कलाकार आहेत, ज्यांचा घटस्फोट किंवा ब्रेकअप जरी झाला असला तरी ते एकमेकांच्या संपर्कात आहेत. इंडस्ट्रीत असे अनेक कलाकार आहेत, जे घटस्फोटानंतर एकमेकांबरोबर मित्र- मैत्रिणीसारखे राहतात. अशातच आता 'हेरा फेरी' या लोकप्रिय चित्रपटाचे दिग्दर्शक प्रियदर्शन यांनीसुद्धा ते घटस्फोटाच्या दहा वर्षांनंतर त्यांच्या पत्नी लिसी लक्ष्मीबरोबर राहत असल्याचं सांगितलं आहे. दोघांनी त्यांच्या नात्याला एक संधी दिली आहे; परंतु यावेळी लग्नबंधनात न अडकताच ते एकमेकांबरोबर राहत आहेत. त्याबद्दल प्रियदर्शन यांनी त्यांची प्रतिक्रियाही व्यक्त केली आहे. दिग्दर्शक सिबी मलयिल यांच्या मुलाच्या लग्नात गेल्या वर्षी या दोघांनी एकत्र हजेरी लावलेली. त्यावेळी दोघे एकमेकांचा हात पकडून हसत- खेळत एकमेकांशी संवाद साधत होते. तेव्हपासूनच त्यांच्या एकत्र येण्याबाबतच्या चर्चा सुरू झाल्या होत्या. अशातच आता लिसी लक्ष्मी यांनी सोशल मीडियावर दाक्षिणात्य सुपरस्टार मामुटी यांच्याबरोबरचा प्रियदर्शन व त्यांचा फोटो शेअर केल्यानं चर्चेला उधाण आलं आहे. प्रियदर्शन म्हणाले, मॅरेज सर्टिफिकेट सोडलं, तर आम्ही पूर्वीसारखंच आयुष्य जगत आहोत. कुटुंबाच्या जवळच्या एका सूत्रानं सांगितलं की, मामुटी यांनी त्या दोघांना भेटून त्यांच्या पुनर्मिलनाबद्दलचा आनंद व्यक्त केला. प्रियदर्शन व लिसा लक्ष्मी यांची मुलं कल्याणी प्रियदर्शन व सिद्धार्थ यांचा त्यांच्या आई-वडिलांच्या पुनर्मिलनामध्ये महत्त्वाची भूमिका आहे. उल्लेख केलेल्या माध्यमाच्या वृत्तानुसार सहा ते आठ महिन्यांपूर्वीच हा निर्णय घेण्यात आला होता. प्रियदर्शन व लिसा लक्ष्मी पुन्हा लग्न करणार नसून, त्यांच्यासाठी लग्न म्हणजे फक्त एक सर्टिफिकेट आहे; पण, मैत्री, साथ व प्रेम या गोष्टी त्यांच्यासाठी अधिक महत्त्वाच्या आहेत. दरम्यान, १९९० मध्ये दोघेही यशाच्या शिखरावर असताना त्यांनी एकमेकांशी लग्न केलं. त्यानंतर लिसा यांनी अभिनय क्षेत्रातून ब्रेक घेतला; पण, २४ वर्षांच्या संसारानंतर त्यांनी २०१६ मध्ये घटस्फोट घेतला.

# साऊथ सुपरस्टारला मृणालने शिकवले मराठी





मराठी मुलगी ते स्टार असा प्रवास करणारी अभिनेत्री म्हणजे मृणाल ठाकूर. मुळची धुळ्याची असलेल्या मृणालने केवळ अभिनयानेच नव्हे, तर आपल्या संस्कारांनीही प्रेक्षकांची मनं जिंकली आहेत. आज ती चित्रपटसृष्टीत यशाच्या शिखरावर पोहोचली असली, तरी तिच्यातलं मराठीपण अजूनही तितकंच घट्ट आहे. मराठी, अहिराणी भाषेबद्दलही तिचं विशेष प्रेम आहे.

ती अनेकदा मराठीत संवाद साधताना दिसते आता मृणालनं थेट दाक्षिणात्य सुपरस्टार अदिवी शेषला मराठीचे धडे दिले दिल्याचं पाहायला मिळालं. मृणालने अदिवी शेष याचा एक व्हिडीओ सोशल मीडियावर शेअर केला आहे. या व्हिडीओच्या कॅप्शनमध्ये मृणालनं लिहलं, ऐका हो मुलींनो... नवीन मराठी मुलगा अलर्ट. व्हिडीओमध्ये मृणालनं अभिनेत्याला काही भन्नाट मराठी संवाद बोलायला सांगितले. सुरवातीला तिने त्याच्याकडून ए चोमडी इकडे ये... ए कार्टे हे वाक्य वदवून घेतले. त्यानंतर तिनं आदिवला 'अशी ही बनवाबनवी' सिनेमाचं गाणं तिच्या मागोमाग गायला सांगितलं. ऐवढेच नाही तर आचार्यांची बायको वेडी काय हा लोकप्रिय डायलॉगही आदिवनं म्हणून दाखवला. दाक्षिणात्य असूनही अदिवीने ज्या सफाईदारपणे मराठी बोलला, ते पाहून चाहते थक्क झाले आहेत. दोघांचा हा मजेशीर व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर तुफान व्हायरल होत आहे. दरम्यान, अदिवी शेष आणि मृणाल ठाकूर यांचा 'डकैत: ए लव्ह स्टोरी' हा चित्रपट १० एप्रिल रोजी प्रदर्शित होणार आहे. शनील देव दिग्दर्शित या ॲक्शन- थ्रिलर चित्रपट चित्रपटात अनुराग कश्यप खलनायकाच्या भूमिकेत आहे. शिवाय या चित्रपटात प्रकाश राज, अतुल कुलकर्णी अशा दमदार कलाकारांचा समावेश आहे. अदिवी हा त्याच्या हँन्डसम लूक आणि अभिनयामुळे चाहत्यांचा लाडका आहे. तर मृणालनं हिंदी टेलिव्हिजन, मराठी आणि हिंदी चित्रपटांसह दक्षिणेतही काम केलं आहे.

# विजय सेतुपतीच्या 'महाराजा'चा सिक्वेल येणार

दाक्षिणात्य इंडस्ट्रीतील लोकप्रिय अभिनेता विजय सेतुपतीनं अनेक चित्रपटांत दमदार अभिनय करीत प्रेक्षकांची मनं जिंकली आहेत. विजय सेतुपतीचे चित्रपट एकापेक्षा असतात. विजयच्या कारकिर्दीतील ५० वा आणि सर्वात यशस्वी चित्रपट ठरलेल्या 'महाराजा' या चित्रपटाच्या जबरदस्त 'क्लायमॅक्स'ने प्रेक्षकांना थक्क केले होते. आता या चित्रपटाच्या सिक्वेलबद्दल माहिती समोर आली आहे. 'महाराजा २' येणार असल्याची पुष्टी स्वतः विजय सेतुपतीने केली आहे. नुकत्याच दिलेल्या एका मुलाखतीत विजय सेतुपतीने चित्रपटाबद्दल माहिती दिली. तो म्हणाला, दिग्दर्शक निथिलन समीनाथन यांनी 'महाराजा २'ची कथा पूर्ण केली आहे. मी ही पटकथा वाचण्यास आणि पुन्हा एकदा ती व्यक्तिरेखा जगण्यास खूप उत्सुक आहे. आम्ही लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येऊ. मात्र, हा चित्रपट कधी प्रदर्शित होईल, याबाबत अभिनेत्याने अद्याप निश्चित तारीख स्पष्ट केलेली नाही. जून २०२४ मध्ये प्रदर्शित झालेल्या 'महाराजा' चित्रपटाने प्रेक्षकांना आणि समीक्षकांना प्रेमात पाडलं होतं. केवळ २० कोटी रुपयांच्या बजेटमध्ये बनलेल्या या चित्रपटाने जगभरात १०० कोटींची कमाई करत नवा इतिहास रचला होता. एका सामान्य व्यक्तीच्या आयुष्यातील एका घटनेने संपूर्ण कथानकाला मिळालेले वळण आणि त्यातील सस्पेन्स प्रेक्षकांच्या पसंतीस उतरला होता. पहिल्या भागात अनुराग कश्यपने साकारलेली खलनायकाची भूमिका आणि चित्रपटाचा धक्कादायक 'क्लायमॅक्स' ही या सिनेमाची सर्वात मोठी ताकद होती. 'महाराजा २'मध्ये कथा पहिल्या भागाच्या पुढे जाईल की एक नवी सस्पेन्सफुल गोष्ट दाखवली जाईल, याबाबत सोशल मीडियावर चर्चा रंगली आहे. 'महाराजा २' सिक्वेल येतोय ही बातमी सेतुपतीच्या चाहत्यांसाठी एखाद्या सेलिब्रेशनपेक्षा कमी नाही.

# एज गॅप रोमान्सवर अक्षय कुमार म्हणाला...



एज गॅप रोमान्स हा बॉलीवूडमधील चर्चेत असणाऱ्या विषयांपैकी एक आहे. अनेक लोकप्रिय नायकांनी त्यांच्याहून कितीतरी वर्षांनी लहान असलेल्या नायिकांसह स्क्रीनवर रोमान्स केला आहे. अशातच आता पुन्हा हा मुद्दा चर्चेत आला आहे, याचं कारण आहे अक्षय कुमार. अक्षय कुमार बॉलीवूडमधील लोकप्रिय अभिनेता असून तो नेहमी इंडस्ट्रीतील गोष्टींबद्दल मोकळेपणानं बोलत असतो. अशातच आता त्याला त्याच्यापेक्षा लहान अभिनेत्रीबरोबर चित्रपटात रोमान्स करण्याबद्दल विचारल्यानंतर त्यानं स्पष्ट प्रतिक्रिया दिली आहे. अक्षय कुमार नेमकं काय म्हणाला याबद्दल सविस्तर जाणून घेऊयात..

अक्षय कुमार येत्या काळात 'भूत बंगला' या प्रियदर्शन यांच्या चित्रपटातून झळकणार आहे. यामध्ये अभिनेत्री वामिका गब्बी मुख्य नायिकेच्या भूमिकेत आहे. अक्षय कुमारबरोबर तिनं चित्रपटात स्क्रीन शेअर केली आहे. दोघांमध्ये २६ वर्षांचं अंतर आहे. अक्षयचं वय ५८ आहे, तर वामिकाचं ३२ आहे. अशातच आता त्यानं मग अशा ऑनस्क्रीन जोडप्यांबद्दल आक्षेप घेण्यासारखं काय आहे असं म्हटलं आहे. अक्षय म्हणाला, त्यात काय झालं? आपण आधी कधीच असं पाहिलं नाहीये का? हे हॉलीवूडमध्येही होत असतं. काहीवेळा ती चित्रपटाच्या कथेची गरज असते. किती तरी लोक त्यांच्यापेक्षा वयानं मोठ्या किंवा लहान असलेल्या लोकांशी लग्न करतात. अक्षय कुमार नंतर 'भूत बंगला' चित्रपटाचे दिग्दर्शक याबद्दल म्हणाले, खरं वय आणि स्क्रीनवरचं वय यामध्ये फरक असतो. काहीवेळा स्क्रीनवर ज्या वयाचं पात्र कलाकार साकारत असतो, खऱ्या आयुष्यात त्याचं वय वेगळं असतं. पण, लोक त्यांचा स्वीकार करतात; मला त्यात काहीच समस्या वाटत नाही. अक्षय कुमार वामिकाबद्दल पुढे म्हणाला, आम्ही भूत बंगलासाठी शूटिंग करत होतो तेव्हाच मी पहिल्यांदा वामिकाला भेटलो. ती खूप गांभीर्यानं काम करते. सलमानही ट्विंकल व काजोल यांच्या 'टू मच विथ काजोल अँड ट्विंकल खन्ना' या शोमध्ये त्याचं मत मांडलं होतं. त्यावेळी त्यानं 'सिकंदर'मध्ये रश्मिका मंदानाबरोबर काम करण्याबद्दल सांगितलेलं. समलान म्हणालेला, अशी चर्चा होती की नायिकेत आणि माझ्यामध्ये ३१ वर्षांचं अंतर आहे. पण नायिकेला याचा काही त्रास नसेल, तिच्या वडिलांनाही त्याचा काही त्रास नसेल तर इतरांना यामुळे समस्या का व्हायला हव्या? तिला मुलगी झाल्यानंतर मी तिच्या मुलीबरोबरही काम करेन. दरम्यान, प्रियदर्शन आणि अक्षय कुमारची भूमिका असलेला 'भूत बंगला' चित्रपट १० एप्रिलला प्रदर्शित होणार आहे.

# नोरा फतेही संकटात!



बॉलिवूडची 'डान्सिंग क्वीन' नोरा फतेही आणि संजय दत्त यांचं 'केडी द डेविल' सिनेमातील 'सरके चुनर तेरी सरके' हे गाणं वादाच्या भोवऱ्यात अडकलं आहे. गाण्यातील अश्लील शब्द आणि बोल्ड हुक स्टेप्सचा भडीमार यामुळे गाण्यावर आक्षेप घेतला गेला आहे. मात्र, आता हा वाद केवळ ट्रोलिंगपुरता मर्यादित न राहता थेट नोराच्या भारतातील वास्तव्यापर्यंत पोहोचला आहे. १० वकिलांच्या एका गटाने नोराचे 'वर्क परमिट' रद्द करण्याची मागणी केली आहे. नोरा फतेही एका मोठ्या कायदेशीर वादात अडकली आहे. वृत्तानुसार, वकिलांच्या एका गटाने केंद्रीय गृह मंत्रालयाकडे याचिका दाखल केली आहे. या याचिकेत नोरा फतेहीचे भारतातील कामाचे परमिट रद्द करून तिला देशाबाहेर हद्दपार करण्याची मागणी करण्यात आली आहे.

नोरा भारतातील वास्तव्याच्या विशेषाधिकाराचा गैरवापर करत असून, ती अश्लील आणि भारतीय संस्कृतीला काळिमा फासणाऱ्या आशयाचा प्रसार करत असल्याचा आरोप या तक्रारीत करण्यात आला आहे. या तक्रारीत 'परदेशी नागरिक कायदा, १९४६' चा संदर्भ देण्यात आला आहे. वकिलांच्या मते, जर एखाद्या परदेशी नागरिकाचे वर्तन सार्वजनिक सभ्यता किंवा सुव्यवस्थेसाठी घातक ठरत असेल, तर सरकारला त्यांच्यावर कठोर कारवाईचे अधिकार आहेत. या संदर्भात केंद्रीय चित्रपट प्रमाणन मंडळ, माहिती तंत्रज्ञान मंत्रालय आणि राष्ट्रीय महिला आयोगाकडेही अधिकृत तक्रारी नोंदवण्यात आल्या आहेत. वाढता वाद पाहून 'सरके चुनर तेरी सरके' हे गाणे सर्व प्लॅटफॉर्मवरून हटवण्यात आले आहे. या प्रकरणावर स्पष्टीकरण देताना नोरा फतेहीने सोशल मीडियावर एक व्हिडीओ शेअर केला होता. तिने म्हटले की, या गाण्यातील हिंदी ओळींबद्दल मला पूर्वकल्पना नव्हती, त्यामुळे माझ्यावर होणारे ट्रोलिंग चुकीचे आहे. दरम्यान, गाण्याच्या गीतकारानेही माफी मागितली असून, कन्नड शब्दांचे हिंदीत चुकीचे भाषांतर झाल्यामुळे हा गोंधळ उडाल्याचे स्पष्ट केले आहे. मात्र, आता वकिलांच्या आक्रमक पवित्र्यामुळे नोराच्या अडचणी वाढण्याची शक्यता आहे.